अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# राजकारणातला शाई रे शाईचा प्रयोग

होळी झाली. धुळवड झाली. रंगपंचमीही संपली. आता राजकारणातली शाई पंचमी सुरू झालेली दिसते. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा आणि महनीय नेते शरदचंद्रजी पवारसाहेब यांनी मतदानाच्यावेळेला कशी शाई संहिता वापरली पाहिजे याविषयी एका जाहीरसभेत सगळ्याच अभिजनांचे प्रबोधन केले. लोकशाहीने आचार, विचार, स्वातंत्र्य दिले आहे. त्यामुळेच मतदानाच्याकाळात या आचार स्वातंत्र्याचा पुरेपूर फायदा जनसामान्यांनी घ्यावा दोन ठिकाणी नावे नोंदवलेली असतील तर ते मतदान करून दुसऱ्या ठिकाणी मतदानाला जावे आणि जाण्यापूर्वी आपल्या बोटावर लावलेली शाई पुसून टाकावी अशी मौलिक सूचना श्रीयुत शरदचंद्रजी पवार यांनी केली.त्यानंतर आमआदमी पार्टीचे नेते ठिकठिकाणी प्रचाराला जाताना आपापसात शाई पंचमी खेळत आहेत. इकडे शरद पवार शाई पुसून टाकण्याचे तंत्र सांगत आहेत तर तिकडे आम आदमी पार्टीचे नेते पुन्हा पुन्हा शाईमय कसे होता येईल. याचे तंत्र सांगत आहेत. या दोन्ही नेत्यांचे शाई महात्म्य ऐकल्यानंतर त्यांना राजकारणातले आपले शाहीस्थान टिकवून ठेवणे आणखीनच सोपे जात आहे. त्याबरोबरच राजकारणामध्ये शाई आणि सहीला देखील तितकेच महत्व असते. या शाई आणि सहीचा मनमौजी वापर करण्याची सवय लागल्यानंतर सगळ्याच राजकारण्यांच्या वागण्याबोलण्यामध्ये व्यवहारामध्ये आपोआप एक शाहीपणा यायला लागतो आणि म्हणूनच दुसऱ्यांदा मतदान करताना बोटावरची शाई पुसून टाकण्याची तितकीच शाही सूचना माननीय पवार साहेबांनी केली. हा सगळा प्रकार पाहिल्यानंतर यंदाच्या लोकसभा निवडणुकीत सही, शाई आणि शाही या तीन गोष्टींना सर्वाधिक महत्व प्राप्त झालेले दिसते.या तीन कारणांमुळे निवडणुकीत आवश्यक असलेली प्रसिध्दी मिळवणे आणखीनच सोपे होत आहे. राजकारणात कोणत्या व्यक्तीला केव्हा महत्व प्राप्त होईल हे जसे सांगता येत नाही तसेच कोणत्या गोष्टीला प्रसिध्दी मिळेल हेही सांगता येत नाही. निवडणुकीतला हा शाई रे शाईचा प्रयोग बऱ्यापैकी लोकांचे मनोरंजन करणारा ठरतो आहे. एवढे मात्र खरे. आपण बोलू त्याला अशाप्रकारे महत्व प्राप्त होईल असे शरद पवारांना अजिबात वाटले नव्हते. आणि आपल्यामुळे शाईचे महत्व वाढेल असे अरविंद केजरीवाल यांच्याही मनात आले नसावे.

## पवारांचे शाईमहात्म्य

शरद पवारांची राजकारणामध्ये अनेकवर्षे गेली आहेत.राजकारण कोळून प्यायलेल्या पवारांना काय बोलावे आणि काय बोलू नये याचे निश्चितच भान असेल मात्र यावेळेला आपण निवडणूक रिंगणात नाही.म्हणजे आपल्याला आचारसंहिता लागू नाही असा त्यांचा बहुतेक समज झालेला दिसतो. त्यामुळेच त्यांच्या तोंडून शाई पुसण्याचा सही मार्ग सांगितला गेला असावा. खरे तर समाजशास्त्र किंवा मानसशास्त्र असे सांगते की एखादा विचार जेव्हा तोंडातून बाहेर पडतो त्यावेळेला त्याविषयी कुठेतरी आधी चिंतन झालेले असते किंवा वारंवार असे प्रकार कुठेतरी पाहिलेले असतात ऐकलेले असावेत आणि मग त्याचा कुठेतरी अचानकपणे बोलबाला होऊन जातो.कारण सातत्याने तसेच घडत गेले की मग आतादेखील तसे घडले तर काही बिघडणार नाही. असा त्यामागचा खरा हेतू असतो. बोगस मतदान हा प्रकार निवडणुकांमध्ये सर्रासपणे चालतो. शाई पुसण्याचा प्रकार हा काही अलिकडचा नाही. गेली किमान चाळीस वर्षे हे उद्योग अव्याहतपणे चालू राहिले अगदी ग्रामीण भागातल्या निरक्षरतेचा गैरफायदा घेऊन ते झोपडपट्ट्यांमधल्या दुहेरी नावांची संधी साधून शहरातही शाई पुसून दोनदाच नव्हे तर अगदी दहा दहा वेळा मतदान करणारे विक्रमवीर सापडले आहेत. एकदा राजकारणच करायचे म्हटले आणि निवडणूक जिंकायचीच म्हटली तर अशा प्रकारचे उपदव्याप अनेक राजकीय पक्ष त्यांचे कार्यकर्ते आणि नेते करीत असतात. बोगस मतदान हे खरे तर लोकशाहीतले ओपन सिक्रेट आहे असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. त्याचा जेव्हा अतिरेक व्हायला लागला तेव्हा निवडणूक आयोगाने प्रत्येकाला ओळखपत्र देण्याचे फर्मान काढले आणि या बोगस मतदानाला आळा घालण्याचा प्रयत्न केला.परंतु आता त्याचाही फारसा परिणाम होत नाही. अनेक ठिकाणी संगनमताने अगदी इलेक्ट्रॉनिक यंत्रे असली तरी हे प्रकार घडताना दिसतात.अशा परिस्थितीमध्ये निवडणुकीचे खरे रंगरूप वेगळेच असते. जाहीरसभा प्रचारसभा यातून मिळणाऱ्या मतदानाचे प्रमाण आणि शाई पुसून केले जाणाऱ्या मतदानाचे प्रमाण समसमान असल्याचेच दिसून येईल. दुर्दैव एवढेच आहे की अशा प्रवृत्तींचे समर्थन होत आहे. मतदानाच्या पवित्र हक्काला कुठेतरी गालबोट लागत आहे. एक शाई एवढी करामत करू शकते. हे यानिमित्ताने पुन्हा दिसून आले. पवारांनी या करामतीचे उदाहरण सांगितले. तर आम आदमी पार्टीमध्ये त्याचे प्रात्यक्षिकीकरण होत आहे.

## एक सही लाखमोलाची

एखाद्याची सही ही त्याची व्यक्तिगत ओळख असते. त्यामुळे तो ती फार जपून वापरतो. राजकारणात सहीचे महत्व काय आहे. हे वेगळे सांगण्याची गरज नाही. नेता किंवा एखाद्या मंत्र्याच्या एका सहीने कशी कामे होतात आणि कशी कामे अडतात हे जगजाहीर आहे. ही सही करताना कोणती शाई वापरायची यालादेखील राजकारणात फार महत्व असते. एखादे काम करायचेच नसेल तर सरळ लालशाईचा शेरा मारला जातो. एखादे काम तातडीने करावे असा आदेश द्यायचा असेल तर त्यासाठी हिरव्या शाईचा पेन वापरला जातो आणि एखाद्या कामाची चालढकल करायची असेल तर काळ्या शाईचाही आधार घेतला जातो.काही दिवसापूर्वीच शरद पवारांनी मुख्यमंत्र्यांचा सही करताना हात का थरथर कापतो अशाप्रकारचा सवाल केला होता. याचा अर्थ सहीला आणि सही केल्या जाणाऱ्या पेनातल्या शाईला कसे महत्व आहे हेही आपोआप सिध्द झाले होते. आपल्या देशात लोकशाही व्यवस्थेतल्या राजकीय प्रक्रियेत यासाठीच सही, शाई आणि शाही या गोष्टी एकमेकांशी बरोबर जोडलेल्या राहिल्या. कारण त्या एकमेकांना पूरक ठरलेल्या आहेत. काही का असेना मनातल्या छुप्या गोष्टी निवडणुकीच्या निमित्ताने बाहेर पडतात. लोकांना खरे काय याचेही दर्शन घडते आणि आपण जे समजतो तसे राजकारण नाही त्याचे रंगरूप वेगळे आहे याची देखील खात्री पटते.